# ✲ जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा. ✲

## ❖ निविदा सूचना ❖

मानिय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब, वर्धा यांचे आदेशानुसार जिल्हा व सत्र न्यायालय वर्धा हयांचे आस्थापनेवरील नक्कल व अभिलेख विभाग व विविध विभाग येथे अभिलेखातील अनावश्यक कागदपत्रे, फाईल्स इ. त्वरीत नष्ट करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानची इलेक्ट्रॉनिक्स मशीन (श्रेडींग मशीन) आवश्यकता आहे. करिता स्थानिक बाजारातील कंपनी/विक्रेत्यांकडून श्रेडींग मशीनबाबतची निविदा (कोटेशन) मागविण्यात येत आहे. ज्या विक्रेत्यांना/कंपनीला श्रेडींग मशीनबाबत निविदा सादर करावयाच्या आहे त्यांनी आपली निविदा बंद लिफाफ्यामध्ये आवश्यक त्या सर्व दराने विवरणासह जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथे दिनांक **२२/०१/२०१८** ला सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत अथवा त्या आधी सादर करावी. निविदेचे लिफाफ्यावर **श्रेडींग मशीन खरेदीबाबत निविदा** असे स्पष्ट लिहावे.

## ● निविदेच्या अटी व शर्ती ●

१) सदर श्रेडींग मशीनचे (Installation) संपूर्ण फिटींग निविदाधारकास स्वत:हा करावयाची असून फिटींगचे साहित्य इतर लागणारे साहित्य त्यात समाविष्ठ राहिल.

२) निविदा मंजूर झालेल्या दिनांकापासून १५ दिवसाचे आत निविदाधारकास जिल्हा न्यायालयाचे आस्थापनेवर श्रेडींग मशीन लावून दयावी लागेल. तसेच प्रात्यक्षिकासह (Demo) त्याची कार्यप्रणाली समजावून सांगावी लागेल.

३) दिनांक २२/०१/२०१८ ला सायं. ५.०० वाजेपर्यंत किंवा त्या अगोदर आपली सीलबंद दर निविदा या कार्यालयाला पोहचणे आवश्यक आहे.

(स्वाक्षरी)
प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय,
वर्धा.

पृष्ठांकन क्र. 248/डी.एन./२०१८.
दिनांक : १२/०१/२०१८.

प्रतिलीपी माहितीस व योग्य कार्यवाहिस सादर. :-

१) नोटीस बोर्ड, जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा.
२) नोटीस बोर्ड, जिल्हा परिषद, वर्धा.
३) नोटीस बोर्ड, जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा.
४) सहा. अधिक्षक, संगणक विभाग, जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा. सदरची प्रत जिल्हा न्यायालय, वर्धा चे संकेतस्थावर. प्रसिध्दीकरीता

(स्वाक्षरी)
प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय,
वर्धा.

01c